# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, 132 / बी, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे - 411 007.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419 ई-मेल : mauebpune@yahoo.co.in

**<u>बातमी प्रसिध्दीसाठी</u>**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्याशाखांमध्ये **शैक्षणिक** वर्ष २०२३-२०२४ साठी **"पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२३"** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत दि.२२.०७.२०२३ ते दि.२४.०७.२०२३ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम वर्षातील पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहिती-पुस्तिका काळजीपूर्वक वाचणे गरजेचे आहे. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याचा कालावधी **दि.१९.०४.२०२३ ते दि.०२.०५.२०२३** असा राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन बँकींग (नेटबँकींग) डेबिट/ क्रेडीट कार्डव्दारे दि.१९.०४.२०२३ (दुपारी १२.०१) पासून ते दि.०३.०५.२०२३ (दुपारी १२.०१) तारखेपर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परीक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तद्नंतर संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेशपत्र वरील संकेतस्थळावरुन दि.१२.०७.२०२३ पासून प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

उत्तरपत्रिका दि.०१.०८.२०२३ व परीक्षेचा संभाव्य निकाल दि. ०५.०८.२०२३ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८११९/०२०-२५५२८५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे डॉ. अमोल मा. देठे, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

***स्वाक्षरी/-***

**दिनांक : १८.०४.२०२३** **नियंत्रक**

**स्थळ : पुणे** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे